# महावितरण विद्युत वार्ता

वर्ष १३ वे : अंक ०६ डिसेंबर २०१७

सन २०१८ अखेर देशातील सर्वांना वीज उपलब्ध करून देण्याचा संकल्प मा.पंतप्रधान यांनी जाहिर केला आहे. आज प्रत्येकांसाठी वीज ही मूलभूत गरज बनली आहे. प्रत्येकांना शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या विद्युत वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण, सक्षमीकरण व क्षमतावाढ ही कामे सातत्याने करावी लागतात. आजही काही भागात पैसा किंवा सुविधेअभावी विजेसारख्या मूलभूत गरजेपासून काहीना वंचित राहावे लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारने शहरी भागातील ग्राहकांसाठी एकात्मिक ऊर्जा विकास योजना तर ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना आणलेल्या असून या योजनेच्या माध्यमातून विशेषतः गावपाड्यात राहणाऱ्या दारिद्र रेषेखालील लाभार्थीचे आयुष्य प्रकाशमय करण्याची संधी लाभली आहे. आपल्याकडे या दोन्ही योजनांची कामे आता सुरु झाली आहेत.

एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत शहरी भागातील पाच हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महावितरणच्या ४४ मंडल कार्यालयातील २५४ शहरांमध्ये विविध विकासात्मक कामे आपण राबवित आहोत. या योजनेसाठी केंद्र सरकारने रूपये २,३०० कोटींचा निधी मंजूर केला आहे. या योजनेमध्ये ३३/११ किव्होची १२८ नवीन उपकेंद्रे उभारण्यात येणार असून ८२ उपकेंद्रांची क्षमतावाढ करण्यात येईल. याशिवाय ग्रामीण भागातील ३३ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेसाठी केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने रू. २ हजार १६४ कोटीचा निधी मंजूर केला आहे. या योजनेमध्ये कृषी व अकृषक वीज वाहिन्यांचे विलगीकरण करणे, ग्रामीण भागातील विजेचे वितरण व वहन प्रणालीचे सक्षमीकरण व क्षमतावाढ करणे आणि वीजपुरवठा नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील लाभधारकांच्या घरकुलांना वीजपुरवठा देण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करणे व सांसद आदर्श ग्राम योजनेत अंतर्भूत करण्यात आलेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधेचे आधुनिकीकरण व सक्षमीकरणाची कामे करण्यात येणार आहेत. याशिवाय या योजनेमध्ये ३३ / ११ किव्होची २१६ नवीन उपकेंद्र उभारण्यात येणार असून १४ उपकेंद्रांची क्षमतावाढ करण्यात येणार आहे. तसेच ७७१ वीज वाहिन्यांचे विलगीकरण करण्यात येणार आहे.



## हितगुज

- दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती व एकात्मिक ऊर्जा विकास योजनेची कामे प्रगतीवर.
- ३३ / ११ किव्होची ३६४ उपकेंद्रांची उभारणी.
- ११३ उपकेंद्रांची क्षमतावाढ.
- शहरासोबतच ग्रामीण भागात पायाभूत सुविधेचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण.
- योजनेतील कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण.
- समाज माध्यमावर येणाऱ्या तक्रारी प्राध्यानाने सोडविण्यात याव्यात.

या दोन्ही योजनांसाठी केंद्र सरकारतर्फे ६० टक्के अनुदान मिळणार असून योजनेतील कामे निर्धारित वेळेत पूर्ण झाल्यास १५ टक्के वाढीव अनुदान देण्याची तरतूद या योजनेमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे या योजनांची कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात यावीत. तसेच या योजनेतील कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावीत यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी या कामाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

ग्राहकांना सर्वोत्तम व उच्चदर्जाची सेवा मिळावी आणि त्यांच्या तक्रारींचे त्वरित निवारण व्हावे यासाठी आपण सर्व सेवा व सुविधा ऑनलाईन उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ग्राहकांना आपल्या तक्रारींची नोंद करण्यासाठी मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्र, सर्व मंडल कार्यालयांच्या ठिकाणी असलेले ग्राहक सुविधा केंद्र, मोबाईल ॲप, ट्विटर, फेसबुक व हेल्पडेस्क अशा विविध सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तरी देखील ग्राहकांच्या तक्रारींचे वेळेवर निवारण होत नाही. विविध तक्रारींसाठी त्यांना कार्यालयात चकरा माराव्या लागतात. ट्विटर, फेसबुक या समाज माध्यमांचा वापरही आज ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात होत आहे. नवीन वीजजोडणी असो किंवा वीजबिलांच्या तक्रारी असो, अशा सहजपणे सुटणाऱ्या तक्रारी ट्विटरवर पडलेल्या असतात. परंतु, काही अधिकाऱ्यांकडून या तक्रारींना साधा रिप्लाय सुध्दा दिला जात नाही. सर्व परिमंडल व मंडल कार्यालयातील सक्षम अधिकाऱ्यांनी समाज माध्यमांद्वारे आलेल्या तक्रारींची नोंद तातडीने घेऊन त्या वेळेत सोडविल्या जातील, याकडे जाणिवपूर्वक लक्ष द्यावे.

**संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## थकबाकी वसुली ही प्रत्येकाची सर्वोच्च जबाबदारी

पुणे प्रादेशिक विभागात 'शून्य थकबाकी' मोहिमेद्वारे थकबाकीदारांना वीजबिल भरा अन्यथा वीजपुरवठा खंडित होणारच असा संदेश दिला जात असून प्रादेशिक संचालक श्री. संजय ताकसांडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व हजारो जनमित्रांच्या सहभागातून घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीजग्राहकांकडून थकबाकी वसुल करण्यासाठी 'शून्य थकबाकी' ला पश्चिम महाराष्ट्रातील सुरवात झाली आहे.



प्रादेशिक संचालक श्री. संजय ताकसांडे यांनी जनमित्रांशी थेट संवाद साधला. यावेळी मुख्य अभियंता श्री. एम. जी. शिंदे उपस्थित होते.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरु झालेल्या शून्य थकबाकी मोहिमेदरम्यान प्रादेशिक संचालक श्री. संजय ताकसांडे यांनी पुणे, सातारा, कोल्हापूर, बारामती, सांगली व सोलापूर या ठिकाणी हजारो जनमित्रांशी थेट संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, महावितरणची थकबाकी वसुली ही प्रत्येकाची सर्वोच्च जबाबदारी असली पाहिजे. जनमित्र हे महावितरणचे आधारस्तंभ आहेत व सैनिक आहेत. मात्र आता महावितरणच्या अस्तित्वासाठी थकबाकीविरोधात लढा देण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी कर्तव्यनिष्ठेने थकबाकी वसुलीसाठी प्रयत्न केले पाहिजे. 'शून्य थकबाकी' च्या मोहिमेतून प्रत्येक थकबाकीदाराला दरमहा नियमित वीजबिल भरण्याची सवय लागली पाहिजे. एक तर थकीत वीजबिल ताबडतोब भरा अन्यथा अंधारात राहा असा प्रत्यय थकबाकीदारांना द्यावा, असे आवाहन केले.

प्रादेशिक संचालक श्री. संजय ताकसांडे यांच्या आवाहनाला पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व बारामती येथे उपस्थित हजारो जनमित्रांनी मोठा प्रतिसाद दिला व थकबाकी वसुल करण्याचा एकमुखी निर्धार केला. यावेळी मुख्य अभियंता श्री. एम. जी. शिंदे (पुणे), श्री. नागनाथ इरवाडकर (बारामती), श्री. किशोर परदेशी (कोल्हापूर) यांच्यासह अधीक्षक अभियंते उपस्थित होते. यावेळी जनमित्रांना 'शून्य थकबाकी' मोहिमेच्या महत्वासह महावितरणच्या आर्थिक परिस्थितीबाबत माहिती देण्यात आली. पुणे प्रादेशिक विभागातील जनमित्र प्रत्येकी सुमारे २५ ते १०० जणांच्या एका पथकाने अद्ययावत 'डीडीएल' (डेली डिस्कनेक्शन लिस्ट) याद्या घेऊन थकबाकीदारांची संख्या अधिक असलेल्या उपनगर, परिसर, मोठ्या सोसायटी, गावे आदी ठिकाणी जात आहेत. सोसायटी, गावे, उपनगरात आलेले हे पथके नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

या मोहिमेत वीजग्राहकांकडे किती रक्कम थकीत आहे हे न पाहता वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. थेट अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, लेखा अधिकारी तसेच हजारो जनमित्र एकाच वेळी या मोहिमेत सहभागी झाले आहेत. तसेच वरिष्ठ कार्यालयातील अभियंते, अधिकारी यांचेही विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती गरजे प्रमाणे करावी

महावितरणची आर्थिक परिस्थिती चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून महावितरण कंपनीत उपलब्ध कर्मचारी व रिक्त पदाचा पुरेपूर आढावा घेवून अधीक्षक अभियंता यांच्या नियंत्रणाखाली निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी. गरजेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येवू नये. कंत्राटी कर्मचाऱ्यांचा राखीव पूल तयार करून उपकेंद्रात रिक्त ठिकाणी गरजेप्रमाणे त्यांचा उपयोग केल्यास कंपनीवर आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत अदा करण्यासाठी नियोजनपूर्व काम करण्याचे निर्देश कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री सचिन ढोले यांनी दिले.



महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. सचिन ढोले यांनी पुणे परिमंडलातील मानव संसाधन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

मानव संसाधन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री सचिन ढोले यांनी नुकताच औरंगाबाद, पुणे व कोकण प्रादेशिक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या परिमंडल कार्यालयांचा दौरा केला. या दरम्यान श्री. ढोले यांनी मानव संसाधन विभाग, कामगार व लेखा विभाग, कंत्राटी कामगारांचे प्रतिनिधी व विविध कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष सुसंवाद साधला. विविध परिमंडलांच्या कार्यालयात घेण्यात आलेल्या या विशेष बैठकीमधून त्यांनी महावितरणची सद्यस्थिती, कामगारांचे प्रश्न व कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांविषयी आढावा घेतला. या बैठकींना मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक श्री ढोले यांनी सांगितले की, कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करून खर्चात बचत करण्याची जबाबदारी सर्वच कर्मचाऱ्यांची आहे. बाह्यस्त्रोत मनुष्यबळ कमी करून त्याचा किमान वापर कसा करता येईल यादृष्टिने नियोजन करावे. श्री.ढोले यांनी ३३/११ केव्ही उपकेंद्र फुलंब्री, लघुप्रशिक्षण केंद्र, मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्र, क्रांतीचौक उपविभागास भेट देऊन पाहणी केली.

कार्यकारी संचालक श्री.ढोले यांनी घेतलेल्या परिमंडलस्तरिय बैठकीस संबंधित परिमंडलाचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, मानव संसाधन विभाग, लेखा विभाग, कामगार विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## नेरूळ विभागात आरोग्य शिबीर संपन्न



कर्मचाऱ्यांची तपासणी करताना डॉक्टर, सोबत उपस्थित अधिकारी

वाशी मंडलांतर्गत येणाऱ्या नेरूळ विभागातील कर्मचाऱ्यांकरिता मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर नुकतेच संपन्न झाले. लायन्स क्लब, नवी मुंबई व अपोलो हॉस्पिटलच्या सहकार्याने हे शिबीर पार पडले. या शिबिराचा लाभ नेरूळ विभागाअंतर्गत असलेल्या नेरूळ, पामबीच, सीबीडी या तीनही उपविभागातील १५० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला. तसेच या आरोग्य शिबिरात २० कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. यावेळी अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या टीमने कर्मचाऱ्यांची तपासणी करून आवश्यक त्या आरोग्यविषयक सूचना केल्या. तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना तणावरहीत जीवन व निरोगी आयुष्य यावर मार्गदर्शन केले.

नेरूळ विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सिद्धराज किन्नूर यांनी, पुढाकार घेऊन शिबीर यशस्वी करणाऱ्या लायन्स क्लबच्या अध्यक्ष श्रीमती अनुराधा करपे यांचे आभार मानले. यावेळी अपोलो हॉस्पिटलच्या डॉ. अश्विनी पिपळे, डॉ.अनुराधा व त्यांच्या टीमने कर्मचाऱ्यांची तपासणी केली. या कार्यक्रमास कोकण विभागाचे प्रादेशिक संचालक श्री सतिश करपे व लायन्स क्लबच्या उषा तलवार व प्रताप मुदलियार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी मुकेश तनेजा, उज्ज्वला खोबरेकर, नेरूळ उपविभागाच्या अति. कार्यकारी अभियंता अस्मिता पाटील, पामबीच उपविभागाचे अति.कार्यकारी अभियंता सोपानराव पवार तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे प्रादेशिक कार्यालयाच्या संघाला विजेतेपद

पुणे परिमंडलाने आयोजित केलेल्या एकदिवसीय क्रीडा स्पर्धेत पुणे प्रादेशिक कार्यालयाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. एम. जी. शिंदे यांच्याहस्ते स्पर्धेतील विजेत्या संघांना व खेळाडूंना बक्षीस प्रदान करण्यात आले. येथील वाडिया कॉलेजच्या मैदानात झालेल्या स्पर्धेचे उद्‌घाटन मुख्य अभियंता श्री. एम. जी. शिंदे यांच्याहस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अधीक्षक अभियंता श्री. महेंद्र दिवाकर, राजेंद्र पवार यांची उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय व राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केलेल्या महावितरणमधील अनेक दिग्गज खेळाडूंसह सुमारे १४० पुरुष व महिला अधिकारी, कर्मचारी या स्पर्धेत भाग घेतला.

## नागपूर प्रादेशिक संचालकांनी घेतला चंद्रपूर परिमंडलाचा आढावा



प्रादेशिक संचालक श्री. भालचंद्र खंडाईत चंद्रपूर परिमंडलातंर्गत येणाऱ्या कार्यालयांच्या कामाचा आढावा घेतांना सोबत मुख्य अभियंता दिलीप घुगल व इतर.

नागपूर प्रादेशिक विभागाचे संचालक श्री. भालचंद्र खंडाईत यांनी चंद्रपूर परिमंडल कार्यालयास नुकतीच भेट दिली. त्यांनी चंद्रपूर परिमंडलातंर्गत येणाऱ्या सर्व मंडल व विभागीय कामाचा आढावा घेतला. या बैठकीत थकबाकी, वीजबिलाची वसुली, आरएपीडीआरपी, शहरातील हानी विषयासह थकबाकी वसुली आदी विषयांचा आढावा घेतला. तसेच वीजचोरींविरूध्द सातत्याने मोहिमा राबविण्यात येवून त्यांच्याविरूध्द कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. ग्राहक हा महावितरणचा केंद्रबिंदू आहे त्यामुळे ग्राहकांना सेवा देतांना ग्राहकांशी आत्मियतेने व सौजन्याने वागून त्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याच्या सूचना केल्यात.

विजेचा गैरवापर करून शेतीच्या कुंपनातून वीजप्रवाह सोडणे व त्यातून होणारे अपघात तसेच शिकारीसाठी विजेचा गैरवापर करणे आदी प्रकारांवर आळा बसण्यासाठी लाईनमन तसेच अभियंत्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना केल्यात. विजेचा गैरवापर करण्यात विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

चंद्रपूर येथील गजानन मंदीर वार्डात राहणारे तसेच महावितरणच्या अमरावती परिमंडलातील पांढरकवडा उपविभागात कार्यरत सहा. अभियंता श्री. सस्नेह वासेकर यांना ते मारेगाव येथे वीजबिलाची थकबाकी वसुलीसाठी गेले असता जबर मारहाण झाली होती. सहा. अभियंता श्री. सस्नेह वासेकर यांच्या घरी जाऊन श्री. खंडाईत यांनी त्यांची भेट घेतली. महावितरणचे कर्मचारी उन, वारा, पावसात, ग्राहकांचा वीजपुरवठा दुरूस्त करूण देण्याचे काम करीत असतात. परंतु अनेकदा त्यांना ग्राहकांच्या रोषाला बळी पडावे लागते. ब्रम्हपूरी, चंद्रपूर विभागाअंतर्गत गांगलवाडी उपकेंद्रामध्ये कार्यरत वरिष्ठ तंत्रज्ञ भारत मेश्राम हे कर्तव्यावर असतांना मारहाण झाली होती. कर्मचाऱ्यांना अनेकदा त्यांना ग्राहकांच्या रोषाला बळी पडावे लागते. कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणीच्या प्रसंगात वरिष्ठ अभियंत्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

याबैठकीस मुख्य अभियंता श्री. दिलीप घुगल, अधीक्षक अभियंता श्री. हरीश गजबे व श्री. अशोक म्हस्के यांच्यासह सर्व विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

## महावितरण कार्यालयात संविधान दिवस साजरा



उद्देशिकेचे वाचन करतांना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार सोबत महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी.

महावितरण आणि महानिर्मिती या कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे आज संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. तसेच यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

यप्रसंगी महावितरण आणि महानिर्मितीचे संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अमरावती परिमंडल:** शिवाजी नगर येथील विद्युतभवनात मुख्य अभियंता यांच्या दालनात 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता श्री.सुहास रंगारी यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. त्यांच्यामागोमाग सर्वांनी उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री. सुहास मेत्रे, अनिल वाकोडे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. रूपेश देशमुख यांच्यासह परिमंडल व मंडल कार्यालयातील अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**औरंगाबाद परिमंडल:** औरंगाबाद प्रादेशिक कार्यालय व औरंगाबाद परिमंडल कार्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अधीक्षक अभियंता श्री रतन सोनुले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्रीमती शिल्पा काबरा, कार्यकारी अभियंते ए.पी पठाण, पवनकुमार कछोट, अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

**नांदेड परिमंडल:** स्वातंत्र्य, समता आणि न्याय या त्रिसुत्रीच्या आधारे प्रत्येक भारतीयाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क प्रदान करणारे भारतीय संविधान हे जगात एकमेव असे संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशातील विविध जाती, धर्मांच्या लोकांना समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्यामध्ये आनंदात



संविधान उद्देशिकेचे वाचनप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. आर.आर.कांबळे व सोबत इतर

राहता येईल असे संविधान दि. २६ नोव्हेंबर १९५० रोजी देशाला प्रदान करुन मानवतेच्या दृष्टीने फारमोठे काम केले आहे. त्याप्रति कृतज्ञता व्यक्त हे करणे भारतीयाचे कर्तव्य आहे, असे विचार नांदेड मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. आर आर. कांबळे यांनी व्यक्त केले. नांदेड परिमंडलातील सभागृहात संविधान दिन साजरा करण्यात आला त्या प्रसंगी श्री. कांबळे बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. आर. आर. कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन महामानवास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन प्रभारी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. शैलेंद्र पाटील यांनी करुन उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वदवून घेतले. याप्रसंगी परिमंडलाचे कार्यकारी अभियंते सर्वश्री शिवलिंग धडके, सिध्दार्थ रसाळ, ए. ए. सौदागर, व्यंकट निरवार प्रामुख्याने उपस्थित होते.

**कोल्हापूर परिमंडल:** कोल्हापूर परिमंडलाच्या प्रशासकीय इमारतीत भारतीय संविधान दिवस साजरा करण्यात आला. यप्रसंगी कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. किशोर परदेशी यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेस व संविधानाच्या कोनशीलेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांनी उद्देशिकेचे वाचन करुन उपस्थित अधिकारी, अभियंते व कर्मचारी यांना सामूहिक शपथ दिली.



संविधान दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित मुख्य अभियंता श्री. किशोर परदेशी सोबत इतर वरिष्ठ अधिकारी

यावेळी विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. शिरीष काटकर यांनी केले.

**जळगांव परिमंडळ:** जळगांव परिमंडलात संविधान दिनाच्या निमित्ताने सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री. दत्तात्रय बनसोडे, अशोक साळुंखे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) श्री. धैर्यशिल गायकवाड, वरिष्ठ व्यवस्थापक (विवले) श्री. अमोल बोरसे, आदी उपस्थित होते.

## सबऑर्डिनेट इंजिनिअर्स क्रेडीट सोसायटीला 'दीपस्तंभ' पुरस्कार

पुणे येथील सब ऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला सहकार क्षेत्रातील मानाच्या 'दीपस्तंभ २०१७' पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. सलग दुसऱ्या वर्षी या क्रेडीट सोसायटीची पुणे विभागातून या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड मुंबई या संस्थेच्यावतीने राज्यातील पगारदार पतसंस्थेच्या गटातून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष श्री. काकासाहेब कोयटे यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सब ऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी अध्यक्ष श्री. उदय साठे, सचिव श्री. शिवाजीराव लाड, खजिनदार सौ. मृदुला शिवदे, संचालक श्री. शिरीष भिसे, श्री. सागर चिरके, श्री. श्रावण सोनारघरे, कार्यलक्षी संचालिका सौ. प्रज्ञा पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## मुंबई असोसिएशनच्या कबड्डी स्पर्धेत पुरुष संघाला विजेतेपद



अर्जुन पुरस्कारप्राप्त श्री.सदानंद शेटये कबड्डी संघास चषक प्रदान करताना सोबत प्रशिक्षक श्री. संतोष विश्वेकर व इतर

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा-२०१७ च्या कै. गणपत लाड सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धेच्या विशेष व्यावसायिक गटात महावितरणच्या पुरुष कबड्डी संघाने अंतिम फेरीच्या सामन्यात बलाढ्य देना बँक संघावर ३७ विरुध्द ३१ अशा ६ गुणांनी विजय मिळवला व विजेते पद पटकावले.

या स्पर्धेत महावितरण संघाच्या श्री. किरण देवाडीगा, श्री. देवेंद्र शिंदे, श्री. धीरज रोकडे, श्री. अजय शिंदे, श्री. नितीन देशमुख, श्री. निलेश ठाकूर, श्री. विश्वास पाटील या खेळाडुंनी सहभाग घेवून यश प्राप्त केले. कबड्डीमध्ये पहिल्यांदा अर्जुन पुरस्कार पटकविणारे श्री.सदानंद शेटये यांच्या हस्ते कबड्डी संघास चषक प्रदान करण्यात आला. संघाचे प्रशिक्षक व व्यवस्थापक या दोन्ही जबाबदाऱ्या राष्ट्रीय खेळाडू श्री. संतोष विश्वेकर यांनी यशस्वीरित्या पार पाडल्या.

या स्पर्धेमध्ये यश संपादन केल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार, संचालक (संचलन) श्री. अभिजीत देशपांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) श्री. सचिन ढोले यांनी कबड्डी संघाचे कौतूक करुन अभिनंदन केले आहे. यावेळी प्रभारी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.संजय ढोके, सहमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. पी एस पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड उपस्थित होते.

## ॲथलेटिक्स स्पर्धेत महावितरणची चमकदार कामगिरी



पटियाला येथे झालेल्या भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ॲथलेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक व रजतपदक प्राप्त करणारे श्री. गुलाबसिंग वसावे (पुणे)व कांस्यपदक विजेते श्री. संभाजी जाधव (कोल्हापूर) व सोबत महावितरणचा संघ.

## सुरेखा भालशंकर यांचा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर



चेन्नई येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत जालना येथील चाचणी विभागात सहायक अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या कु. सुरेखा शिवाजी भालशंकर यांनी "महावितरण - वीज चोरी रोखण्याचे तंत्र" या विषयावर शोध निबंध सादर केला.

वीज गळती आणि वीज गळती रोखण्याचे मुख्य कारणे, स्वयंचलित अत्याधुनिक तंत्राची गरज, ड्रोन बारकोड स्कॅनर आणि कटिंग टूल मेकॅनिझम बसविणे आदींची कारणमीमांसा करून हा शोधनिबंध कु. सुरेखा हिने सादर केला. महावितरणने १ टक्के वीज गळती रोखल्यास २२५ कोटी रुपयांचा आर्थिक फायदा होत असल्याचा निष्कर्ष या शोध निबंधात मांडला आहे. कु. सुरेखा या जळगाव मंडल कार्यालयात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्री. शिवाजी भालशंकर यांची मुलगी आहे.

## पृथ्वीराज सोनवणेची राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड



पंजाबमधील फतेहगड येथे आयोजित पोनी राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात पृथ्वीराज सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. पृथ्वीराज सोनवणे जळगाव येथील ब. गो. शानबाग विद्यालयात आठव्या वर्गात शिकत असून जळगाव विभागातील उच्चस्तर लिपीक (लेखा) श्री. विजय सोनवणे व पाचोरा विभागातील मुख्य लिपीक सौ. वंदना तेलंग यांचा मुलगा आहे.

## अथर्व सावंतची नेत्रदिपक कामगिरी



अलीबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये महाराष्ट्राच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषदेद्वारे आयोजित राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा सन २०१७-१८ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अथर्व सावंत याने रजत पदक जिंकले. आधी तालुका स्पर्धा, जिल्हा स्पर्धा नंतर झोनल स्पर्धा या सर्व स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकत चि. अथर्वने मुंबई संघामध्ये आपले स्थान कायम ठेवले. १६ वर्षांचा असूनही त्याने १६ वर्षांवरील गटात खेळून हे यश मिळवले.

चि. अथर्व हा ब्लॅक बेल्ट डॉन वन आहे. सप्टेंबर-२०१७ मध्ये तायक्वांदोचे खेळाचे हेडक्वार्टर कुक्कीवोन, साऊथ कोरिया येथे ब्लॅक बेल्ट डॉन टू प्रमोशन परीक्षा तो उत्तीर्ण झाला. यापूर्वीही चि. अथर्वने अनेक राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेऊन अनेक पदके जिंकली आहेत. मुंबईच्या स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात शिकत असलेला अथर्व हा धारावी येथील मुख्य तपास अधिकारी यांच्या कार्यालयात उच्चस्तर लिपीक म्हणून कार्यरत असलेले श्री स्वप्निल सावंत यांचा मुलगा आहे.

## महावितरणचा राष्ट्रीयस्तरावरील बेस्ट पॉवर युटिलिटीसह तीन ॲवार्डने गौरव

नवी दिल्ली येथे इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स व केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या विद्यमाने आयोजित ११ व्या इंडियन एनर्जी समिटमध्ये महावितरणचा बेस्ट पॉवर युटिलीटीमध्ये द्वितीय क्रमांकाच्या ॲवार्डने गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात महावितरणला प्रथम क्रमांकाचा मोस्ट इनोव्हेटीव्ह डिस्कॉम ॲवार्ड तसेच ग्रिन ग्रिडमध्ये द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार यांनी हे पुरस्कार स्वीकारले.



ॲवार्ड स्वीकारताना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजीव कुमार व इतर अधिकारी.

कार्यक्रमात विविध राज्यातील वीज वितरण कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यात महावितरणने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या प्रभावी कामगिरीबद्दल बेस्ट पॉवर युटिलिटीच्या द्वितीय क्रमांकाच्या ॲवार्डने गौरविण्यात आले.

ग्राहकसेवेंतर्गत अत्याधुनिक आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्याबद्दल महावितरणला प्रथम क्रमांकाचा मोस्ट इनोव्हेटीव्ह डिस्कॉम ॲवार्ड तसेच अपारंपारिक ऊर्जेच्या क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल ग्रिन ग्रिडमध्येही द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स व केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या विद्यमाने इंडियन एनर्जी समिट २०१७ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या

## भांडुप येथे सुरक्षा व अंमलबजावणी कार्यालय कार्यान्वित


कार्यालयाचे उद्घाटनप्रसंगी श्री. अरविंद साळवे व इतर.

भांडुप नागरी परिमंडल येथे सुरक्षा व अंमलबजावणीचे नवीन कार्यालय नुकतेच कार्यान्वित करण्यात आले असून या कार्यालयाचे उद्घाटन कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. अरविंद साळवे यांचे हस्ते करण्यात आले.

या नवीन कार्यालयाचे प्रमुख सहायक संचालक (सुवअं)असणार आहेत. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र भांडुप व रत्नागिरी परिमंडल आहे. या कार्यक्रमावेळी कोकण प्रादेशिक विभागाचे उपसंचालक (सुवअं) सुमित कुमार, कार्यकारी अभियंता (अंमलबजावणी), विनय काळे, भांडुप येथील नवनिर्मित कार्यालयाचे प्रभारी सहाय्यक संचालक (सुवअं) मुकेश ठाकूर, कार्यकारी अभियंता (सुवअं), कल्याण ए. ए. खान तसेच सुरक्षा व अंमलबजावणी विभागातील अधिकारी, भरारी पथकाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री अरविंद साळवे (भापोसे) यांच्या भांडुप नागरी परिमंडलाच्या भेटी निमित्त, भांडुप परिमंडल, कार्यालयामार्फत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सहायक महाव्यवस्थापक (मासं) नेमिलाल राठोड, प्रभारी कार्यकारी अभियंता (प्रवसु) दिलीप शेट्टी, वरिष्ठ व्यवस्थापक (मासं) निलेश भवर आदी मान्यवर उपस्थित होते.

## महावितरणला 'चॅम्पियन ऑफ चेंज' ॲवार्ड


वित्तमंत्री मा. श्री. अरुण जेटली यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना मुख्य महाव्यवस्थापक श्रीमती रंजना पगारे.

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाकडून देण्यात येत असलेल्या 'चॅम्पियन ऑफ चेंज' या पुरस्कारासाठी महावितरण कंपनीची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार केंद्रीय वित्तमंत्री मा. ना. श्री. अरुण जेटली यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे नुकताच देण्यात आला.

विविध राज्यांतील केंद्र व राज्य सरकारच्या अखत्यारितील कंपन्या व संस्था यांचा सहभाग आणि मानांकन लक्षात घेऊन या पुरस्कारासाठी ही निवड करण्यात येत असते. सार्वजनिक उपक्रमातील संस्थांनी जास्तीत जास्त शिकाऊ उमेदवारांना दिलेली नियुक्ती, प्रशिक्षण व गुणवत्तेची कामगिरी लक्षात घेऊन 'चॅम्पियन ऑफ चेंज' या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. महावितरणच्या प्रशिक्षण व कौशल्य विकास क्षेत्रातील सन २०१६-१७ ची कामगिरी लक्षात घेऊन मानांकन श्रेणीतून महावितरणची 'चॅम्पियन ऑफ चेंज' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

नाशिक एकलहरे येथील प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राच्या मुख्य महाव्यवस्थापक श्रीमती रंजना पगारे यांनी हा पुरस्कार कौशल्य विकास मंत्रालयाच्या तिसऱ्या वर्धापन दिनाच्या शानदार सोहळ्यात स्वीकारला.

Printed & Published by Shri. Anil Mukundrao Kamble of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotiring Enterprises, 212 - B, Deen Bldg. Compound, Shop No. 32,
N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2074
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक: अनिल कांबळे